# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड
# (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प)

## मेट्रो सुरक्षा कर्मचाऱ्यांनी सराईत सायकल चोराला पकडले

## सीसीटीव्हीच्या मदतीने सुरक्षा कर्मचाऱ्यांनी चोराला धरले



नागपूर मागील ३ महिन्यापासून झांसी राणी चौक मेट्रो स्टेशन ते लोकमान्य नगर मेट्रो स्टेशन दरम्यान सायकल चोरीच्या अनेक घटना आढळून आल्या स्टेशन परिसरातील सीसीटीव्ही कॅमेरा मध्ये एकच व्यक्ती या सर्व घटनांमध्ये आढळून आल्याचे निदर्शनास आले. चोराला पकडण्याकरिता महा मेट्रोच्या वतीने मोहीम राबविण्यात आली. दिनांक १३ मे रोजी सदर व्यक्ती पुनः एकदा ऍक्वा लाईन मार्गिकेवरील बंसी नगर मेट्रो स्टेशन येथे रचना रिंग रोड मेट्रो स्टेशन कडे

जाणाऱ्या मेट्रो ट्रेन मध्ये निदर्शनास आला बंसी नगर मेट्रो स्टेशन येथे कार्यरत सुरक्षा रक्षक अक्षय तागडे यांनी रचना रिंग रोड मेट्रो स्टेशन येथे कार्यरत स्टेशन कंट्रोलर अभिजित ठोकल,सुरक्षा रक्षक आणि स्टेशन परिसरातील कर्मचाऱ्यांना अवगत केले असता सदर व्यक्तीला रचना रिंग रोड मेट्रो स्टेशन येथे ताब्यात घेऊन चौकशी करण्यात आली चौकशी दरम्यान त्याने चोरी केल्याची कबुली देत त्याचे नाव भगवान दास करिया असल्याचे सांगितले

पुढील कार्यवाही करिता सदर आरोपीला एमआयडीसी पोलीस स्टेशनला सुपूर्द करत आयपीसी कलम ५११ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला व चोरीला गेलेल्या सायकल जप्त करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.मेट्रो कर्मचाऱ्याच्या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.